**निशाणी क्र. ६२ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ याने त्याचेविरुध्द दिनांक ०२/१२/२०१४ रोजी झालेला विना कैफियतचा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याचे म्हणणेनुसार तो सदर कामी हजर झाला होता, मात्र वादीचा दावा प्रतिवादी क्र. १ बरोबर वाटपासाठी असल्याने त्यास त्याची हरकत नव्हती. त्यामुळे तो कैफियत देण्यास न्यायालयात आलेला नव्हता त्यामुळे त्याचेविरुध्द विनाकैफियत आदेश झालेला आहे. मात्र वादीने नि. २५ व नि. ५१ व्दारे दाव्यात दुरुस्ती केल्यामुळे त्याला त्याची कैफियत देणे आवश्यक वाटत आहे. त्यामुळे त्याचेविरुध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द करुन कैफियत स्विकारण्याची विनंती त्याने केली आहे.

**२.** वादी याने नि. ६३ ला म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याचे कथनानुसार सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. प्रतिवादी क्र. ६ याने न्यायालयात हजर होवून देखील आपली कैफियत दिलेली नाही. त्याने नि. २५ च्या अर्जानुसार केवळ दावा मिळकतीच्या स्थानिक नावाबाबत दुरुस्ती करुन घेतली आहे व नि. ५१ च्या दुरुस्ती व्दारे प्रतिवादी क्र. १० यास आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ठ केले आहे. सदर दुरुस्तीशी प्रस्तुत प्रतिवादीचा कोणताही संबंध नाही. त्या दुरुस्तीव्दारे त्याने प्रस्तुत प्रतिवादीविरुध्द कोणतीही दाद मागितलेली नाही. त्यामुळे सदर दुरुस्त्यांचा आधार घेवून त्याचेविरुध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द करुन मागण्याचा त्यास कोणताही हक्क व अधिकार नाही. सबब, सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती वादीने केली आहे.

**३.** वादी व प्रतिवादी क्र. ६ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**४.** प्रतिवादी क्र. ६ याने अर्जाचे पुष्ठयर्थ शपथपत्र सादर केले आहे. यावरुन प्रतिवादी क्र. ६ च्या अर्जातील नमूद कारण योग्य आहे असे मानता येईल. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व प्रतिवादी क्र. १ विरुध्द

निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांचेमध्ये असलेले वादाचे निराकरण याच दाव्याचेकामी होणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. ६ यास दाव्यास कैफियत सादर करण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत सदर प्रतिवादी क्र. ६ याने वादीस खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :

— **आदेश** —

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ६ यास कैफियत दाखल करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादी क्र. ६ याने पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम म्हणून रक्कम रुपये ४००/— दयावी. त्यापैकी प्रतिवादी क्र. ६ याने रक्कम रुपये २००/— वादीस दयावी व उर्वरित रक्कम रुपये २००/— सरकार जमा करावी.

स्थळ : देवगड ( गि. सु. माने )
दिनांक : २१/०७/२०१६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.